RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ६, अंक १२१] सोमवार, डिसेंबर ७, २०२०/अग्रहायण १६, शके १९४२ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २९८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**ग्रामविकास विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट,

मुंबई ४०० ००१, दिनांक ७ डिसेंबर २०२०

**अधिसूचना**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.**

क्रमांक आरटीएस-२०१८/प्र.क्र.१४५/आस्था.५.—ज्याअर्थी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ (सन २०१५ चा महा. अध्यादेश क्रमांक ५) च्या कलम-३ चे पोट–कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार काढण्यात आलेल्या ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या अधिसूचना क्र. आरटीएस-२०१५/प्र.क्र.३२/पंरा-५, दिनांक १० जुलै २०१५ (यापुढे जिचा " उक्त अधिसूचना " असा उल्लेख करण्यात येत आहे) द्वारे ग्रामविकास विभागामार्फत ग्रामपंचायतीद्वारे पात्र व्यक्तींना देण्यात यावयाच्या लोकसेवा आणि त्यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे उक्त अध्यादेशाच्या प्रयोजनार्थ अशा लोकसेवा देण्याकरिता विहित कालमर्यादेसह पदनिर्देशित अधिकारी आणि प्रथम अपील प्राधिकारी व द्वितीय अपील प्राधिकारी अधिसूचित करण्यात आले आहेत ;

आणि ज्याअर्थी, दारिद्र्य रेषेखालील असल्याचा दाखला देण्यासाठी ग्रामसेवक यांना पदनिर्देशित करण्याबाबत महाराष्ट्र शासनास निवेदने प्राप्त झालेली आहेत;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत दारिद्र्य रेषेखालील असल्याचा दाखला देण्यासाठी ग्रामसेवक यांना पदनिर्देशित अधिकारी, सहायक गट विकास अधिकारी यांना प्रथम अपील प्राधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना द्वितीय अपील प्राधिकारी करणे उचित असल्याचे शासनास वाटले आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महा. अधि. ३१) च्या कलम ३ चे पोट–कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन सदर अधिसूचनेमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमधील अ. क्र. ४ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| "४ | दारिद्र्य रेषेखालील असल्याचा दाखला | ७ दिवस | ग्रामसेवक | सहाय्यक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पंडित जाधव,**
शासनाचे उप सचिव.